PARLE MAHOTSAV
Organiser - **MLA ADV. PARAG ALAVANI,** President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. २३.१२.२०१४

कृपया प्रसिद्धीकरिता

# खेळासोबतच खिलाडूवृत्तीही जोपासा - अनिल कपूर
# पार्लेमहोत्सवाच्या क्रीडास्पर्धकांना शुभेच्छा

मुंबई - खेळाला जीवनात महत्त्व आहेच. पण खेळासोबतच खेळामुळे आलेल्या खिलाडूवृत्तीलाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून हार-जीत याचा विचार न करता खेळाचा आनंद घ्या आणि इतरांनाही द्या, असा सल्ला सिनेअभिनेते अनिल कपूर यांनी पार्लेमहोत्सवातील खेळाडूंना दिला. १५व्या पार्लेमहोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी खेळाडूंनी भरगच्च भरलेल्या दुभाषी मैदानावर अनिल कपूर यांनी आपलीही उपस्थिती दर्शविली. सलग १५ वर्षे होत असलेला हा सोहळा पाहून तेदेखील भारावून गेले होते. मॅनेजमेंट गुरू श्री. विठ्ठल कामत हेदेखील महोत्सवातील खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी आले होते. या दोन्ही मान्यवरांचे स्वागत नगरसेविका आणि सहआयोजक सौ. ज्योती अळवणी यांनी केले. आमदार ॲड. पराग अळवणी हे या महोत्सवाचे आयोजन करीत असतात.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी विविध क्रिडांगणांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावर्षी पार्ले महोत्सवात डॉजबॉल हा क्रीडाप्रकार पहिल्यांदाच सामील करण्यात आला. शालेय मुलांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तता दाखवत आपली खेळातील चमकही उपस्थितांच्या नजरेत आणून दिली. याशिवाय, कबड्डी, व्हॉलीबॉल आणि बॉक्स क्रिकेट या स्पर्धाही घेण्यात आल्या. कबड्डीसाठी तर तब्बल २०० संघ मैदानात उतरणार आहेत आणि व्हॉलीबॉलसाठी ८२ संघ एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत.

पार्लेमहोत्सवाच्या उद्घाटनानंतर लगेचच स्लो सायकल, गोळाफेक आणि ५० मीटर धावणे या स्पर्धा पार पडल्या होत्या. या महोत्सवात दिवसागणिक रंग भरत जाणार आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशीच खेळाडू आणि प्रेक्षकांनी दुभाषी मैदान ओसंडून वाहत होते. आयोजनातील प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कार्यकर्त्यांची फळी यांच्या जोडीला त्या त्या क्रीडाक्षेत्रातील तज्ज्ञ या महोत्सवात सहभागी होत असतात.

---

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.